# १. सहकार –अर्थ, इतिहास, वैशिष्ट्ये आणि महत्त्व
(Co-operation – Meaning, History, Features and Importance)


| | |
|---|---|
| १.१ प्रस्तावना | १.५ महत्त्व |
| १.२ अर्थ व व्याख्या | १.६ सारांश |
| १.३ इतिहास | १.७ महत्त्वाच्या संज्ञा |
| १.४ वैशिष्ट्ये | १.८ स्वाध्याय |


## १.१ प्रस्तावना (Introduction) :

प्राचीन काळापासून सहकार हा मानवी संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. मानवाच्या शिकारी अवस्थेपासून आजच्या प्रगत अवस्थेपर्यंतचा विचार केला तर असे आढळते की, एकत्रितपणे विचार करणे व काम करणे ही मानवाची सहज आणि नैसर्गिक प्रवृत्ती आहे. त्यातून त्याला सुखी आयुष्य जगण्याची प्रेरणा मिळते. त्यातूनच त्याच्या आर्थिक आणि सामाजिक आयुष्यात पुढे क्रांतीकारक बदल घडून आले. सहकार ही मानवी सहजीवनाच्या कल्पनेची एक प्रगत अवस्था आहे. यामध्ये मानवास आर्थिक व सामाजिक विकासासाठी आणि अन्याय निवारण्यासाठी एकत्र येण्याची प्रखर इच्छा निर्माण होते. मानवाच्या जीवनप्रणालीचा इतिहास हा सहकाराचा इतिहास आहे. त्यामुळे आधुनिक अर्थव्यवस्थेत सहकाराला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

सहकार म्हणजे एकमेकांना मदत करणे, कौटुंबिक व सामाजिक जीवनात एकत्रित राहणे व काम करणे. सहकार आणि मानवी सहजीवन यांचा जवळचा संबंध आहे. सहकारामध्ये व्यक्तिंनी एकत्रित राहण्याबरोबरच एकमेकांना मदत करण्यासाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांचाही समावेश होतो. सर्वांनी मिळून, एकमेकांच्या मदतीने, सर्वांच्या हितासाठी, एकत्रित काम करणे याला सहकारात विशेष महत्त्व आहे.

या प्रकरणात आपण सहकाराच्या संकल्पनांचा अभ्यास करणार आहोत.

## १.२ सहकार/सहकारी संस्थेचा अर्थ व व्याख्या (Meaning and Definition of Co-operation) :

### १.२.१ अर्थ :

सहकाराला इंग्रजीमध्ये Co-operation असे म्हणतात. Co-operation हा मूळ शब्द लॅटिन भाषेतील Co-operari या शब्दापासून आला आहे. या शब्दातील Co म्हणजे 'सह' किंवा एकत्र व operari म्हणजे कार्य करणे असा या शब्दांचा अर्थ आहे. त्यामुळे Co-operation म्हणजे एकत्रितपणे काम करणे होय. कोणतेही काम एकत्रितपणे करावयाचे असल्यास त्यासाठी इतर व्यक्तिंची मदत घेणे आवश्यक असते. लोकांना स्वत:च्या ज्या गरजा वैयक्तिकरित्या पूर्ण करता येत नाहीत अशा गरजा एकमेकांच्या साहाय्याने सहकारात पूर्ण केल्या जातात. सहकार म्हणजे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंनी एकत्रित येऊन एकमेकांच्या मदतीने आपल्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी स्थापन केलेली संस्था होय.

### १.२.२ व्याख्या :

अनेक विचारवंतांनी सहकाराच्या किंवा सहकारी संस्थेच्या केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

१) एच.कॅल्व्हर्ट– ''मानवी भूमिकेतून व्यक्तिंनी स्वेच्छेने एकत्र येऊन आपल्या आर्थिक हिताच्या वृद्धीसाठी समानतेच्या तत्वावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.''

२) श्री. वैकुंठलाल मेहता (भारतीय सहकारी चळवळीचे प्रणेते) –''समान गरजा असलेल्या व्यक्तिंनी एकत्र येऊन आपल्या समान आर्थिक उद्‌दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्वेच्छेने स्थापन केलेला संघटन प्रकार म्हणजे सहकारी संस्था होय.''

३) भारतीय सहकार कायदा (१९१२) – ''सहकारी तत्त्वांना अनुसरुन आपल्या सभासदांचे आर्थिक हितसंबंध वृद्‌धींगत करण्याचे ज्या संस्थेचे उद्‌दिष्ट असते तिला सहकारी संस्था असे म्हणतात''.

४) सहकार नियोजन समिती (१९४६) –''सहकार हा व्यवसाय संघटनेचा एक प्रकार असून व्यक्ति आपल्या हितरक्षणासाठी समानतेच्या तत्त्वावर स्वेच्छेने एकत्र येतात.''

५) प्रा. पॉल लॅम्बर्ट – ''स्वत:च्या उपयोगासाठी व्यक्तिंच्या समूहाने निर्माण केलेली आणि दिग्दर्शित केलेली, लोकशाही नियमानुसार चालविलेली, सभासद व एकूण समाज यांच्या सेवेसाठी स्थापन झालेली व्यवहार संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.''



**कृती–**

**१) तुमच्या दैनंदिन जीवनातील अशी काही उदाहरणे सांगा की, ज्यामध्ये सहकाराचा अवलंब केला जातो.**

**२) ''व्यक्ति विकासासाठी सांघिक भावना महत्त्वाची असते'' चर्चा करा.**

## १.३ सहकाराचा इतिहास – (History of Co–operation) :

प्रस्तुत प्रकरणात आपण जागतिक, भारतातील व महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचा इतिहास थोडक्यात अभ्यासणार आहोत.

### १.३.१ जागतिक सहकारी चळवळ :

सहकारी चळवळीचा उगम सर्वप्रथम युरोप खंडातील इंग्लंडमध्ये झाला. इ. स.१७६० मध्ये युरोपात औद्योगिक क्रांती घडून आली. औद्योगिक क्रांतीच्या प्रभावामुळे भांडवलशाही प्रवृत्ती वाढीस लागली. परिणामी अधिकाधिक नफा मिळविण्याच्या भांडवलदारांच्या प्रवृत्तीमुळे ग्राहकांचे व कामगारांचे शोषण होऊ लागले. कामगारांना फारच कमी वेतन देण्यात येऊ लागले. शिवाय त्यांचे कामाचे तास वाढविण्यात आल्याने कामगारांच्या दारिद्र्यात भर पडली. ग्राहकांना नकली माल, कमी वजनमापाचा, भेसळयुक्त माल महागड्या किंमतीत कंपन्या विकू लागल्या. त्यामुळे त्यांचेही आर्थिक शोषण होऊन असा वर्ग अधिकाधिक गरीब होत गेला. भांडवलदारांच्या नफ्यात वाढ होऊन ते अधिकाधिक श्रीमंत झाले. गरीब व श्रीमंत यांच्यामधील दरी वाढत जाऊन आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर वाढली. त्यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले.

भांडवलशाही समाजव्यवस्था व नफेखोरीच्या प्रवृत्तीमुळे 'सहकार' या संकल्पनेचा उदय झाला. सर रॉबर्ट ओवेन यांनी कामगारांच्या सहकारी संस्था स्थापन केल्या. तसेच त्यांनी सहकारी तत्त्वांचा प्रत्यक्ष व्यवहारात यशस्वीपणे वापर करून सहकाराचा पाया रचला. म्हणून सर रॉबर्ट ओवेन यांना 'आधुनिक सहकारी चळवळीचे जनक' मानले जाते. इंग्लंडमधील रॉश्डेल येथे २८ विणकरांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर सन १८४४ मध्ये 'रॉश्डेल इक्वीटेबल पायोनियर्स सोसायटी लिमिटेड' या संस्थेची स्थापना करून सहकारी ग्राहक भांडार सुरू केले व सहकारी चळवळीचा पाया घातला गेला.

याच कालखंडात जर्मनीमध्ये पतपुरवठा सहकारी चळवळ सुरू झाली. कॅनडा, चीन, रशियामध्ये शेती सहकारी संस्थांच्या माध्यमातून सहकारी चळवळ सुरू झाली. डेन्मार्क या देशात दुग्ध उत्पादन सहकारी संस्थांच्या स्थापनेतून सहकारी चळवळ सुरू झाली. स्वीडन मध्ये ग्राहक सहकारी संस्था सुरू झाल्या. यानंतरच्या काळात हळूहळू जगातील इतर देशांमध्ये सहकारी चळवळीच्या माध्यमातून सहकारी संस्था सुरू झाल्या.

इ. स.१८९५ मध्ये लंडन येथे आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची (International Co–operative Alliance) स्थापना झाली. ही संघटना सहकारी तत्त्वांचे पालन करणाऱ्या सहकारी संस्थांचे जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करते. जागतिक सहकारी चळवळीच्या विकासात या संस्थेचे योगदान फार महत्त्वाचे आहे.



**कृती–**

**३) सर रॉबर्ट ओवेन यांना आधुनिक सहकारी चळवळीचे जनक मानले जाते. चर्चा करा.**

### १.३.२ भारतीय सहकारी चळवळ :

१८ व्या शतकात इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे वस्तूंचे मोठया प्रमाणावर उत्पादन होऊ लागले. पक्क्या मालाची हक्काची बाजारपेठ व कच्च्या मालासाठी भारताच्या भूप्रदेशाचा वापर ब्रिटिशांनी केला. औद्योगिक क्रांतीचा दुष्परिणाम व ब्रिटिशांच्या कूटनीतीमुळे भारतातील लघु व कुटीरोद्योग बंद पडले. कारागीर व कामगार बेकार झाले. रोजगारासाठी ते शेतीकडे वळले. परिणामी शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या वाढली. शेतीवरील अतिरिक्त भार, दुष्काळ यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती दुर्बल झाली. शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा वाढून ते सावकारी पाशात अडकले. शेतकऱ्यांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्याच्या दृष्टीने कायदेशीर उपाय योजले.

मुंबई प्रांतातील बडोदा येथे भारतातील पहिली सहकारी पतपुरवठा संस्था ५ फेब्रुवारी, १८८९ रोजी स्थापन झाली. प्रा. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी 'अन्योन्य सहाय्यकारी मंडळी' या नावाने पहिली पतपुरवठा संस्था स्थापन केली. ब्रिटिश सरकारने भारतातील सहकारी चळवळीस मूर्त स्वरूप देणारा पहिला सहकार कायदा सन १९०४ मध्ये संमत केला. भारतीय शेतकऱ्यांच्या आर्थिक व सामाजिक जीवनास नवे वळण देणारा हा कायदा होता. हा कायदा फक्त पतसंस्था स्थापन करण्यापुरताच मर्यादित होता. सन १९०४ च्या कायद्यातील त्रुटी व उणिवा दूर करण्यासाठी सन १९१२ मध्ये दुसरा सहकार कायदा संमत केला. या सहकार कायद्यामुळे सहकारी संस्थांची स्थापना सर्व क्षेत्रात होऊ लागली.

भारतातील सहकारी चळवळीची प्रगती व त्रुटी अभ्यासण्यासाठी सन १९१४ साली ब्रिटीश सरकारने एडवर्ड मॅक्लेगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने सहकारी चळवळीच्या भविष्यातील वाटचालीबाबत मौलिक सूचना केल्या. पहिल्या महायुद्धानंतर सन १९१९ मध्ये ब्रिटिश सरकारने 'मॉन्टफोर्ड सुधारणा कायदा' मंजूर केला. या कायद्यामुळे सहकार हा विषय केंद्र सरकारकडून प्रांतिक सरकारांच्या अखत्यारित आला. त्यानुसार सर्वप्रथम मुंबई प्रांताने सन १९२५ मध्ये सहकार कायदा संमत केला.

सहकारी चळवळीची पुनर्रचना करण्यासाठी ज्या विविध समित्या नियुक्त केल्या होत्या त्यांच्या शिफारशीवरुन भारतात रिझर्व्ह बँकेची स्थापना १ एप्रिल, १९३५ रोजी करण्यात आली. या बँकेने शेती पतपुरवठा विभाग सुरू केला. यानंतरच्या काळात केंद्र सरकारने सहकाराच्या विकासासाठी प्रा.धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली 'कृषी अर्थपुरवठा समिती' (१९४४) व श्री.आर.जी.सरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली 'सहकार नियोजन समिती' (१९४५) नियुक्त केली. बँकिंग सोयी व सुधारणासाठी सरकारने श्री.पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांच्या अध्यक्षतेखाली 'ग्रामीण व बँकिंग चौकशी समिती' (१९४९) नेमली. सन १९५१ मध्ये ग्रामीण कर्जपुरवठ्याचा अभ्यास करून शिफारस करण्यासाठी 'अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीची' डॉ. ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्ती केली होती. सन १९५४ मध्ये या समितीने आपला अहवाल सरकारकडे सादर केला. या समितीने आपल्या अहवालात असे मत नोंदविले की, 'सहकार अयशस्वी ठरला आहे तथापि तो यशस्वी झालाच पाहिजे.'

स्वांतत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने सन १९५१ पासून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्याचे धोरण स्वीकारले. पंचवार्षिक योजना दरम्यान सहकारी चळवळीचा विकास व सहकारी चळवळीत लोकांचा सहभाग वाढविणे यावर भर देण्यात आला.

### १.३.३ महाराष्ट्रातील सहकारी चळवळ :

महाराष्ट्र हे सहकार क्षेत्रातील पुढारलेले राज्य असून राज्यभरात सहकारी संस्थांचे मोठे जाळे पसरले आहे. सहकारी पतपुरवठा संस्था, बिगर कृषी पतपुरवठा संस्था, विपणन सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था, प्रक्रिया सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, मजूर सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था अशा विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची स्थापना झाली. त्या यशस्वीपणे कार्यरत असल्यामुळे महाराष्ट्रातील सामान्य नागरिक, शेतकरी या ना त्या कारणामुळे सहकारी संस्थेच्या संपर्कात आला. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीला सुमारे शंभर वर्षाहून अधिक काळाचा इतिहास आहे.

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी संस्थेची स्थापना सन १९२३ मध्ये झाली. या बँकेचे पुढे राज्य शिखर बँकेत रूपांतर होऊन ती सध्या 'महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड' म्हणून कार्यरत आहे. महाराष्ट्रामध्ये सहकारी पतपुरवठ्याबाबत त्रिस्तरीय रचना स्विकारलेली आहे. प्राथमिक स्तरावर प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था, जिल्हा स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, तर राज्य स्तरावर राज्य सहकारी बँक (शिखर बँक) कार्य करते.

स्वातंत्र्यानंतर सन १९५१ मध्ये प्रा.धनंजयराव गाडगीळ व पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखेपाटील यांच्या मार्गदर्शनामुळे प्रवरा सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगर जि.अहमदनगर येथे महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना स्थापन झाला. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी सहकारी चळवळीचे एक नवे पर्व सुरू केले.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० या कायद्यानुसार सहकारी संस्थांचे नियमन व नियंत्रण केले जाते. सन १९६१ मध्ये महाराष्ट्रात विविध प्रकारच्या ३१,५६५ सहकारी संस्था होत्या. मार्च २०१८ अखेर ही संख्या १,९८,२५२ पर्यंत पोहोचली. सहकारी संस्थांच्या संख्येत जसजशी वाढ झाली तसतशी सहकारी संस्थांच्या सभासद संख्येत, भागभांडवल, कर्जे, ठेवी यामध्ये वाढ झाली.


देशातील सहकारी संस्थाच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी केंद्र शासनाने ९७ वी घटनादुरुस्ती अधिनियम २०११ अन्वये सहकार कायद्यात काही सुधारणा केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने १४ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या अध्यादेशाद्वारे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मध्ये सुधारणा केल्या आहेत.



**कृती–**

**४) भारतातील सहकारी चळवळीच्या विकासाला चालना देणाऱ्या महत्त्वाच्या घटनांविषयी आपल्या शिक्षकांबरोबर चर्चा करून माहिती घ्या.**

## १.४ सहकाराची वैशिष्ट्ये : (Features/Characteristics of Co-operation)



**सहकाराची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे**

१) **व्यक्तिंचे संघटन :** समाजातील अनेक व्यक्तिंचे उत्पन्न हे मर्यादित असते. अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ति आपल्या समान गरजा सामुहिकरित्या भागविण्यासाठी एकत्र येऊन सहकारी संस्थेची स्थापना करतात. 'प्रत्येक जण सर्वांसाठी व सर्वजण प्रत्येकासाठी' काम करतात. सर्व सभासद संस्थेचे मालक असतात. सहकारी संस्थेत भांडवलापेक्षा व्यक्ति (सभासद) हा घटक महत्त्वाचा असतो. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० नुसार सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी वेगवेगळ्या कुटुंबातील किमान १० व्यक्ति आवश्यक असतात.

२) **ऐच्छिक संघटन :** सहकाराचे सभासदत्व सर्वांना ऐच्छिक असते. म्हणजेच जात, धर्म, पंथ, लिंग, आर्थिक परिस्थिती यांचा विचार केला जात नाही. सहकारी संस्थेत सभासद होण्यासाठी अथवा सभासदत्व रद्द करण्यासाठी कोणत्याही व्यक्तिवर कोणत्याही प्रकारची सक्ती केली जात नाही. सभासद होणे अगर न होणे हे ठरविण्याचा संपूर्ण अधिकार संबंधित व्यक्तिस असतो. म्हणून सहकारी संस्था ही ऐच्छिक संघटना आहे.

३) **समान उद्दिष्ट :** सहकारामध्ये एकत्र येणाऱ्या व्यक्तिंचे उद्दिष्ट एकसमान असते. समान गरजा असणाऱ्या व्यक्ति आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी एकत्र येऊन सहकारी संस्थेची स्थापना करतात. उदा. घराची गरज असणाऱ्या व्यक्ति एकत्र येऊन सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करतात.

४) **लोकशाही संघटन :** सहकारी संस्था ही एक लोकशाही संघटना आहे. सहकारात भांडवलापेक्षा व्यक्तिला अधिक महत्त्व दिले जाते. कोणत्याही सभासदांचे भांडवल कमी किंवा जास्त असले तरी 'एक व्यक्ति एक मत' या तत्त्वाचा अवलंब केला जातो. सहकारी संस्थेचा कारभार सभासदांनी निवडून दिलेले प्रतिनिधी म्हणजेच संचालक मंडळाकडून लोकशाही पद्धतीने चालविला जातो. लोकशाही कारभार हा सहकाराचा गाभा आहे.

५) **समानता :** सहकारी संस्थेचे सभासदत्व देताना त्या व्यक्तिची जात, धर्म, पंथ, वर्ण, लिंग, आर्थिक परिस्थिती, सामाजिक प्रतिष्ठा इत्यादी बाबी विचारात घेतल्या जात नाहीत. सहकारी संस्थेत कोणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नसतो. सर्व सभासदांना समान दर्जा, समान हक्क व अधिकार असतात. म्हणूनच समानता हा सहकाराचा पाया मानला जातो.

६) **आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे एकत्रीकरण :** आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ति स्वबळावर स्वत:ची आर्थिक प्रगती करू शकत नाही. अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ति सहकारी संस्थेच्या माध्यमातून एकत्र येऊन आपली शक्ती वाढवू शकतात. कारण त्यांच्यात संघशक्ती निर्माण झालेली असते. सहकारी संस्थेमुळे आर्थिक दुर्बल घटक हे भांडवलदार, व्यापारी, दलाल यांच्याकडून होणाऱ्या आर्थिक शोषण व पिळवणूकीला सामुहिकपणे प्रतिकार करू शकतात. म्हणूनच सहकारी संस्था म्हणजे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तिंचे संघटन होय.

७) **सेवा उद्देश :** सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश आपल्या सभासदांना सेवा देणे हा असतो. नफा मिळविणे हा त्यांचा गौण उद्देश असतो. परंतु व्यवस्थापन खर्च भागेल इतका नफा सहकारी संस्थाना मिळवावा लागतो. किमान खर्चात चांगली सेवा उपलब्ध व्हावी या अपेक्षेने संस्थेचे कार्य चालते. संस्थेला आर्थिक व्यवहारातून झालेला नफा देखील चांगल्या सेवा देण्याकरिता उपयोगात आणला जातो.


८) **परस्पर साहाय्यातून स्वसहाय्य :** सहकारी संस्थेत सभासदांच्या परस्पर सहकार्याला अधिक महत्त्व आहे. ''एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ'' यानुसार सभासद स्वत:चे आर्थिक हित आणि विकास एकमेकांच्या मदतीने करून घेतात. उदा. कर्मचाऱ्यांच्या पतसंस्था या प्रत्येक सभासदांकडून दरमहा ठरावीक वर्गणी गोळा करतात. त्यातून गरजू सभासदाला कमी व्याजदराने कर्ज दिले जाते. सुलभ हप्त्याने परतफेड आणि तारणाशिवाय कर्ज मिळाल्याने सभासदाचा फायदा होतो. असे कर्ज म्हणजे अन्य सभासदांनी एका सभासदाला केलेली आर्थिक मदतच असते.

९) **मध्यस्थांचे उच्चाटन :** अनेक आर्थिक व्यवहारांमध्ये आपल्याला मध्यस्थ आढळतात. असे मध्यस्थ सहकारी संस्थांमध्ये नसतात. कारण मध्यस्थांकडून व्यवहारामध्ये नफा घेतला जातो. त्यामुळे वस्तूंच्या किंमती वाढतात. तसेच मध्यस्थ मालात भेसळ, कमी वजनमापे, फसवणूक आदि अनिष्ट व्यापारी प्रथांचा अवलंब करतात. घाऊक व्यापारी व दलाल यासारख्या मध्यस्थांच्या साखळीतून सभासदांचे व ग्राहकांचे आर्थिक शोषण व पिळवणूक केली जाते. सहकारी संस्था मात्र थेट उत्पादकाकडून वस्तू खरेदी करून सभासदांना व ग्राहकांना पुरवितात. त्यामुळे मध्यस्थांचे उच्चाटन होऊन सभासदांना कमी किंमतीत चांगल्या दर्जाच्या वस्तू उपलब्ध होतात. म्हणून मध्यस्थांचे उच्चाटन हे सहकाराचे महत्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

१०) **आर्थिक व सामाजिक चळवळ :** समाजातील आर्थिक दुर्बल घटक आपल्या दुर्बलतेवर मात करून स्वत:चा विकास साधण्याकरिता एकत्र येऊन सहकारी संस्थेची स्थापना करतात. सहकारी संस्थांची जितकी वाढ आणि प्रगती होईल तितक्या प्रमाणात भांडवलदार, कारखानदार आणि व्यापारी वर्गाकडून होणारी समाजाची पिळवणूक व आर्थिक शोषण थांबेल. त्यातून श्रीमंत व गरीब यातील दरी कमी होऊन समाजात आर्थिक समानता निर्माण होण्यास मदत होते. सहकारी संस्थांमुळे समाजातील दुर्बल घटक भांडवलदाराविरुद्ध यशस्वीपणे लढा देतात. जितक्या प्रमाणात सहकारी संस्थांची वाढ आणि प्रगती होईल तितक्या प्रमाणात समाजात समतेवर आधारित अशी समाजरचना तयार होईल. जलद गतीने सामाजिक परिवर्तन घडेल. यासाठी सहकारी चळवळीमध्ये स्वावलंबन, नैतिक विकास, प्रामाणिकपणा यांना महत्त्व दिले जाते. म्हणूनच सहकार हे एक आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले जाते.

११) **व्यवसाय संघटन प्रकार :** सहकारी चळवळ सुरू होण्यापूर्वी व्यवसाय क्षेत्रामध्ये एकल व्यापारी, भागीदारी असे व्यवसाय संघटन प्रकार प्रचलित होते. कालांतराने कंपन्या अस्तित्वात आल्या. या सर्व व्यवसाय संघटना नफा मिळविण्याच्या मुख्य हेतूनेच कार्य करतात. तसेच भांडवल या घटकालाच प्राधान्य देतात. सहकारी संस्थादेखील इतर व्यावसायिक संघटन प्रकाराप्रमाणे व्यवसाय करणारी एक संघटना आहे. परंतु तिचा हेतू नफा मिळविणे हा नसून सेवा देणे व सभासदांचे हित जोपासणे हा असतो.

## १.५ सहकाराचे महत्त्व (Importance of Co-operation) :



सहकारी संस्थांचा देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वाचा सहभाग आहे. आधुनिक समाजरचनेत सहकाराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. सहकाराने देशाच्या ग्रामीण तसेच शहरी जीवनाला एक आकार देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यादृष्टीने सहकाराचे महत्त्व पुढील मुद्द्यांवरून अधिक स्पष्ट करता येईल.

१) **एकसंघ समाजाची निर्मिती :** सहकारात व्यक्तिगत हितापेक्षा व्यक्तिसमुहाच्या हिताला प्राधान्य दिले जाते. सहकारामुळे धर्म, जात, पंथ, लिंग, वर्ण इत्यादी भेद कमी होऊन सर्वांना समान मानले जाते. परिणामी समाजामध्ये समता, एकता, बंधुता, सलोखा व सामंजस्य वाढते आणि एकसंघ समाजाची निर्मिती होण्यास मदत होते.

२) **शेतीक्षेत्राचा विकास :** भारतात प्रामुख्याने शेतीक्षेत्राला पतपुरवठा करण्यासाठी सहकारी चळवळ सुरू झाली. सहकारी पतसंस्था शेतकऱ्यांना सुधारित बी-बियाणे, खते, कीटकनाशके , विद्युतपंप, पाईपलाईन, अवजारे इत्यादीसाठी अल्प व्याजदराने कर्जपुरवठा करतात. त्यामुळे शेती उत्पादन वाढते. परिणामी शेती क्षेत्राचा विकास होण्यास मदत होते.

३) **औद्योगिक विकास :** कारागीर, लघु व कुटीरउद्योजक एकत्र येऊन औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करतात. या संस्थेमार्फत सभासदांसाठी कच्च्या मालाची खरेदी व पक्क्या मालाची विक्री केली जाते. या संस्था लघुउद्योग, कुटीर उद्योगांना चालना देतात. तसेच सहकारी क्षेत्रामुळे शेतीपूरक व शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांचादेखील विकास होतो. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी तेल गिरण्या इत्यादी प्रक्रिया संस्था कार्यरत आहेत. या संस्थामुळे औद्योगिक विकासाला चालना मिळाली आहे.

४) **रोजगार निर्मिती :** सहकारी क्षेत्रामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होण्यास मदत होते. सहकारी साखर कारखाने, सूत गिरण्या, तेल गिरण्या, इत्यादीमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होतो. याशिवाय शेतमजूर, ऊस तोडणी कामगार, वाहतुकदार, अन्य सेवा पुरविणारे व्यावसायिक यांना अप्रत्यक्षपणे रोजगार उपलब्ध होतो. कोणत्याही सहकारी संस्थेस दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी काही कर्मचाऱ्यांची गरज असते. अशा विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या स्थापनेमुळे रोजगाराच्या संधीत वाढ होते.

५) **मक्तेदारीवर नियंत्रण :** ग्रामीण भागात सावकार शेतकऱ्यांना भरमसाठ व्याजदराने कर्जपुरवठा करतात. सहकारी पतसंस्थांच्या स्थापनेमुळे सावकारांची कर्जपुरवठ्यातील मक्तेदारी कमी होण्यास मदत झाली आहे. सहकारी ग्राहक संस्थांमुळे वस्तू वितरणातील मध्यस्थ व व्यापाऱ्यांची मक्तेदारी कमी झाली आहे. मक्तेदारीच्या दुष्परिणामांपासून ग्राहकांचे संरक्षण होण्यास मदत होते. अशा रितीने सहकारी संस्था मक्तेदारीवर नियंत्रण ठेवतात.

६) **स्वसामर्थ्याची जाणीव :** सहकारामुळे समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ति परस्पर सहाय्याने एकत्र येऊन स्वत:चे संरक्षण करू शकतात. त्यांच्यात स्वसामर्थ्याची जाणीव निर्माण होऊन ते आपले शोषण करणाऱ्यांविरुद्ध लढा देऊ शकतात. त्यामुळे आत्मविश्वास वाढून संघटन व व्यवस्थापन कौशल्य इत्यादी गुणांचा विकास होतो. यातून सभासदांमध्ये स्वसामर्थ्याची जाणीव निर्माण होते.

७) **नफ्याचे न्याय्य वाटप :** सहकारी संस्थेला मिळालेले आधिक्य/नफा सर्व सभासदांमध्ये वाटून दिला जातो. आधिक्याचे वाटप हे भाग भांडवलाच्या प्रमाणात व सभासदांनी संस्थेशी केलेल्या आर्थिक व्यवहाराच्या प्रमाणात केले जाते. नफ्याच्या न्याय्य वाटपामुळे वाढीव नफ्यात प्रत्येक सभासदास वाटा मिळतो. परिणामी नफ्याचे न्याय्य वाटप होऊन सभासदांची आर्थिक प्रगती होते.

८) **मध्यस्थांचे उच्चाटन :** सहकारी संस्था या थेट उत्पादकांकडून माल खरेदी करून प्रत्यक्ष ग्राहकांना विकतात. त्यामुळे मध्यस्थ व व्यापाऱ्यांची साखळी नष्ट होण्यास मदत होते. तसेच काही सहकारी संस्था शेतमाल विक्रीची कार्यक्षम

व्यवस्था करतात. त्यामुळे सभासद शेतकऱ्यांना मध्यस्थ, दलाल यांच्यामार्फत माल विकावा लागत नाही. परिणामी मध्यस्थ व दलाल यांच्याकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक व पिळवणूक थांबविता येते. प्रत्यक्ष ग्राहकांना वस्तू विकल्याने शेतमालाला योग्य किंमत मिळते. ग्राहकांनाही तुलनेने वाजवी किंमतीत वस्तू मिळतात. मध्यस्थांकडून होणारी नफेखोरी, वस्तूंची टंचाई,भेसळ, पिळवणूक, आर्थिक शोषण या अनिष्ट प्रवृत्तीस सहकारी संस्थांमुळे पायबंद बसतो. अशा रितीने सहकारी संस्थांमुळे मध्यस्थांचे उच्चाटन होण्यास मदत होते.

९) **खरेदी शक्तीत वाढ :** सहकारी संस्था सभासदांना, ग्राहकांना चांगल्या दर्जाच्या वस्तूंचा पुरवठा वाजवी किंमतीत करतात. वाजवी किंमतीत वस्तू मिळाल्याने पैशाची बचत होते. त्यामुळे सभासदांची खरेदीशक्ती वाढते.

१०) **लोकशाही शिक्षण :** सहकारी संस्थेचे व्यवस्थापन लोकशाही पद्धतीने चालते. सभासदांच्या सर्वसाधारण सभेला सर्वोच्च अधिकार असतात. सहकारी संस्थेचे सर्व निर्णय सभासदांच्या सभेत लोकशाही पद्धतीने सर्वानुमते घेतले जातात. 'एक व्यक्ति एक मत' या नियमाद्वारे सहकारामध्ये लोकशाही तत्त्वप्रणाली व्यवस्थापनासाठी वापरली जाते. सहकारातून सर्वसामान्य लोकांना लोकशाहीचे शिक्षण मिळते. त्यामुळे देशातील लोकशाही बळकट होण्यास मदत होते.



**कृती–**

**५) सहकारी संस्थांमुळे रोजगार निर्मिती होण्यास मदत होते, याविषयी तुमच्या शिक्षकांबरोबर चर्चा करा.**

## ९.६ सारांश

सहकार ही मानवाच्या सहजीवनातून उदयास आलेली संकल्पना असून सहकार म्हणजे एकत्रित राहणे व काम करणे होय.

सहकाराला इंग्रजीमध्ये Co-operation असे म्हटले जाते. Co-operation हा शब्द लॅटिन भाषेतील Co-operari या शब्दापासून आला आहे. Co म्हणजे सह किंवा एकत्र व operari म्हणजे काम करणे होय. अर्थातच Co-operation म्हणजे एकत्रित काम करणे होय.

अनेक विचारवंतांनी सहकाराच्या व्याख्या दिल्या असून या व्याख्यांवरुन असे स्पष्ट होते की, सहकार हे व्यक्तिंचे संघटन असून समान गरजा असलेल्या व्यक्ति आपल्या समान आर्थिक उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी समानतेच्या तत्त्वावर एकत्रित आलेल्या असतात.

आधुनिक सहकार चळवळ ही सर्वप्रथम इंग्लंडमध्ये सुरू झाली. सर रॉबर्ट ओवेन हे सहकारी चळवळीचे जनक मानले जातात. इ. स. १८४४ मध्ये इंग्लंडमधील रॉश्डेल येथे २८ विणकरांनी एकत्रित येऊन 'रॉश्डेल इक्वीटेबल पायोनियर्स सोसायटी लिमिटेड' या नावाची पहिली सहकारी संस्था सुरू केली.

स्वातंत्र्य पूर्वकाळात भारतात विविध टप्प्यात सहकारी चळवळीचा विकास झाला. मात्र तो पुरेशा प्रमाणात नव्हता. सन १९०४ व १९१२ च्या सहकार कायद्याने सहकारी चळवळीस गती मिळाली. स्वातंत्र्यानंतर सहकारी चळवळीच्या विकासासाठी जाणिवपूर्वक प्रयत्न करण्यात आले.

महाराष्ट्र हे सहकारी चळवळीच्या विकासातील देशातील अग्रेसर राज्य आहे. १९ व्या शतकात महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळ सुरू झाली. सन १९६० मधील महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यामुळे सहकारी चळवळीला दिशा मिळाली.

- **सहकाराची वैशिष्ट्ये**

१) व्यक्तिंचे संघटन
२) ऐच्छिक संघटन
३) समान उद्दिष्ट
४) लोकशाही संघटन
५) समानता
६) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे एकत्रीकरण
७) सेवा उद्देश
८) परस्पर साहाय्यातून स्वसहाय्य
९) मध्यस्थांचे उच्चाटन
१०) आर्थिक व सामाजिक चळवळ
११) व्यवसाय संघटन प्रकार

- **सहकाराचे महत्त्व**

१) एकसंघ समाजाची निर्मिती
२) शेतीक्षेत्राचा विकास
३) औद्योगिक विकास
४) रोजगार निर्मिती
५) मक्तेदारीवर नियंत्रण
६) स्वसामर्थ्याची जाणिव
७) नफ्याचे न्याय्य वाटप
८) मध्यस्थांचे उच्चाटन
९) खरेदी शक्तीत वाढ
१०) लोकशाही शिक्षण

## १.७ महत्त्वाच्या संज्ञा

१) **लोकशाही–** लोकांनी, लोकांसाठी,लोकांमार्फत चालविलेले शासन / कार्यपद्धती.

२) **सहकारी चळवळ–** आर्थिकदृष्ट्या दुर्बल व कमकुवत वर्गातील व्यक्तिंनी स्वत:च्या आर्थिक विकासासाठी एकत्र येऊन सुरू केलेली चळवळ.

## १.८ स्वाध्याय

**प्र.१ अ) खालील दिलेल्या पर्यायामधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व पुन्हा लिहा.**

१) सहकारी चळवळीचा उगम सर्वप्रथम ----- या देशात झाला.

अ) इंग्लंड ब) जर्मनी क) फ्रान्स

२) समाजातील आर्थिकदृष्ट्या ----- व्यक्ति एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करतात.

अ) श्रीमंत ब) दुर्बल क) भांडवलदार

३) सहकार म्हणजे ----- चे संघटन होय.

अ) व्यक्ति ब) भांडवल क) मध्यस्थ

४) इंग्लंडमध्ये इ. स. ----- मध्ये सहकारी चळवळ सुरू झाली.

अ) १९४४ ब) १८४४ क) १८८०

५) भारतातील पहिला सहकार कायदा ----- या वर्षी संमत झाला

अ)१९०४ ब) १९६० क) १९१२

६) महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना ----- येथे स्थापन झाला.

अ) कोल्हापूर ब) प्रवरानगर क) नागपूर

७) सहकारी संस्थेत सर्व सभासद ----- मानले जातात.

अ) असमान ब) समान क) गौण

८) सहकारी संस्थेचा मुख्य उद्‌देश ----- हा असतो.

अ) नफा मिळविणे ब) सेवा देणे क) पिळवणूक करणे

९) अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीचे ----- हे अध्यक्ष होते.

अ) प्रा. धनंजयराव गाडगीळ ब) आर.जी. सरैय्या क) डॉ. ए.डी. गोरवाला

**ब) योग्य जोड्या जुळवा.**

| ‘अ’ गट | ‘ब’ गट |
|---|---|
| अ) नफ्याचे न्याय्य वाटप | १) सेवा देणे |
| ब) भारतातील पहिला सहकार कायदा | २) १९१२ |
| क) सहकारी संस्थेचा मुख्य उद्‌देश | ३) आर्थिक व्यवहाराच्या प्रमाणात |
| ड) सहकारी संस्थेचा कारभार | ४) हुकूमशाही पद्‌धतीने |
| इ) सहकारी चळवळीचा उगम देश | ५) जर्मनी |
| | ६) नफा मिळविणे |
| | ७) समान प्रमाणात |
| | ८) लोकशाही पद्‌धतीने |
| | ९) इंग्लंड |
| | १०) १९०४ |

### क) खालील विधानांसाठी एक शब्द/शब्दसमूह लिहा.

१) सहकारी संस्थेचे मालक

२) आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे एक महत्वाचे साधन

३) सहकारी चळवळीचे जनक

४) महाराष्ट्रातील पहिला सहकार कायदा

५) भारतातील दुसरा सहकार कायदा

### ड) खालील विधाने चूक किंवा बरोबर ते लिहा.

१) सहकारी संस्था ही एक ऐच्छिक संघटना आहे.

२) सहकारी संस्था नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन केल्या जातात.

३) सहकारी संस्था आपल्या सभासदांमध्ये कोणताही भेदभाव करीत नाहीत.

४) सहकारी संस्था ही एक हुकूमशाही संघटना आहे.

५) सहकारी संस्थामुळे मध्यस्थांची साखळी नष्ट होण्यास मदत होते.

६) सहकारी संस्था मक्तेदारीवर नियंत्रण ठेवतात.

### (इ) खालील विधाने पूर्ण करा.

१) सहकार म्हणजे .............. चे संघटन होय.

२) सहकारात भांडवलापेक्षा .............. ला अधिक महत्त्व दिले जाते.

३) भारतातील पहिला सहकार कायदा .......... यावर्षी संमत झाला.

४) भारत सरकारने सन ............... पासून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्याचे धोरण स्वीकारले.

५) सहकारी चळवळीचा उगम सर्वप्रथम युरोप खंडातील ............. या देशामध्ये झाला.

### (फ) अचूक पर्याय निवडा.

| | |
|---|---|
| १) आधुनिक सहकारी चळवळीचे जनक | |
| २) एक व्यक्ति | |
| ३) | सहकारी चळवळीचा उगम देश |
| ४) आर्थिक व्यवहाराच्या प्रमाणात | |
| ५) | भारतातील पहिला सहकार कायदा |

१९०४, इंग्लंड, एक मत, १९१२, जर्मनी, सर रॉबर्ट ओवेन, नफ्याचे न्याय्य वाटप

**ग) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सहकार म्हणजे काय?

२) सर रॉबर्ट ओवेन यांना आधुनिक सहकारी चळवळीचे जनक का म्हणतात?

३) संचालक मंडळ म्हणजे काय?

४) ऐच्छिक संघटन म्हणजे काय?

५) इंग्लंडमधील पहिल्या सहकारी ग्राहक भांडाराचे नाव कोणते?

**ह) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्द दुरूस्त करून वाक्य पुन्हा लिहा.**

१) सहकारी संस्थेचा मुख्य उद्देश नफा मिळविणे हा असतो.

२) महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना मुंबई येथे स्थापन झाला.

३) सहकार म्हणजे भांडवलदारांचे संघटन होय.

४) सहकारी चळवळीचा उगम सर्वप्रथम फ्रान्स या देशात झाला.

५) समाजातील श्रीमंत व्यक्ति एकत्रित येऊन सहकारी संस्था स्थापन करतात.

६) सहकारी संस्था ही एक हुकूमशाही संघटना आहे.

**ई) गटात न बसणारा शब्द शोधा.**

१) अ) १९६० चा कायदा ब) १९०४ चा कायदा

क) १९५६ चा कायदा ड) १९१२ चा कायदा

**ज) योग्य क्रम लावा.**

१) अ) भारताचा दुसरा सहकार कायदा ब) मुंबई प्रांत सहकार कायदा

क) भारताचा पहिला सहकार कायदा

२) अ) सहकार नियोजन समिती ब) ग्रामीण व बँकींग चौकशी समिती

क) कृषी अर्थपुरवठा समिती

**प्र.२ खालील संज्ञा स्पष्ट करा.**

१) सहकार

२) समानता

३) लोकशाही शिक्षण

४) एकसंघ समाजाची निर्मिती

५) स्वसामर्थ्याची जाणीव

**प्र.३ स्वमत लिहा./ उपयोजनावर आधारित प्रश्न.**

१) एखाद्या व्यक्तिला सहकाराबाबतचे आपले विचार कसे पटवून द्याल.

२) भारतीय ''सहकारी चळवळ'' या विषयावर आपले मत व्यक्त करा.

**प्र.४ टीपा लिहा.**

१) सहकाराचा अर्थ

२) सहकाराचे महत्व

३) सहकाराची वैशिष्ट्ये

४) जागतिक सहकारी चळवळ

**प्र.५ कारणे द्या.**

१) सेवा देणे हा सहकारी संस्थांचा प्रमुख हेतू असतो.

२) सहकारी संस्था ही लोकशाही संघटना आहे.

३) सहकारी संस्थामुळे मध्यस्थांचे उच्चाटन होते.

४) सहकार हे सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे एक साधन मानले जाते.

**प्र.६ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) सहकाराची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सहकाराचे महत्व स्पष्ट करा.

३) भारतातील सहकारी चळवळीची माहिती लिहा.

**प्र.७ दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) सहकाराची व्याख्या सांगून सहकाराची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) सहकाराचे महत्व सविस्तरपणे स्पष्ट करा.